RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ४, अंक १११] मंगळवार, सप्टेंबर १८, २०१८/भाद्रपद २७, शके १९४० [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, मर्झबान पथ, २५, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ सप्टेंबर २०१८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक मविसे. १०१६/प्र.क्र.१९/२०१६/आस्था-३.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती) नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती), (सुधारणा) नियम, २०१८ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती) नियम, १९७३ (यात यापुढे ज्याचा उल्लेख "मूळ नियम" असा करण्यात आला आहे.) याच्या नियम २ मध्ये खंड (क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल—

"(क-१) "सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (राजपत्रित)" याचा अर्थ पंचायत समितीमधील सहायक गट विकास अधिकारी आणि यात विभागीय आयुक्त कार्यालयामधील सहायक गट विकास अधिकारी (प्रशासन), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील सहायक प्रकल्प अधिकारी (रोजगार), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील सहायक प्रकल्प अधिकारी (संनियंत्रण), ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रामधील व्याख्याता आणि जिल्हा परिषदेतील गट विकास अधिकारी (मनरेगा) या पदांचा समावेश होतो ;

(क-२) "आयोग" याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;".

३. मूळ नियमाच्या नियम ३ मधील—

(क) उप खंड (२) मधील खंड (ख) व (ग) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावेत :—

" (ख) महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ (राजपत्रित) ;

(ग) महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब (राजपत्रित) ;

(ख) उप-खंड (४) व (५) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावेत :—

"(४) महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ (राजपत्रित) यामध्ये पुढील पदांचा समावेश होतो—

(क) विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (आस्थापना) ची ६ पदे,

(ख) विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (विकास) ची ६ पदे,

(ग) जिल्हा परिषदेतील निवडश्रेणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्गातील १३ पदे,

(घ) संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान चे १ पद,

(च) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण चे १ पद,

(छ) जिल्हा परिषदेतील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्गातील २१ पदे,

(ज) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक या संवर्गातील ३४ पदे,

(झ) जिल्हा परिषदेमधील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) ची ३४ पदे,

(ट) जिल्हा परिषदेमधील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) ची ३४ पदे,

(ठ) विभागीय आयुक्त कार्यालयातील सहायक आयुक्त (विकास) ची ६ पदे,

(ड) विभागीय आयुक्त कार्यालयातील सहायक आयुक्त (चौकशी) ची ६ पदे,

(ढ) विभागीय आयुक्त कार्यालयातील सहायक आयुक्त (तपासणी) ची ६ पदे,

(त) ग्राम सेवक प्रशिक्षण केंद्रातील प्राचार्य ची ६ पदे,

(थ) पंचायत समितीचे निवडश्रेणी गट विकास अधिकारी संवर्गातील ५६ पदे,

(द) पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संवर्गातील २९५ पदे,

(५) महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब (राजपत्रित) यामध्ये पुढील पदांचा समावेश होतो—

(क) पंचायत समितीमधील सहायक गट विकास अधिकारी संवर्गातील ३५१ पदे,

(ख) विभागीय आयुक्त कार्यालयातील सहायक गट विकास अधिकारी (प्रशासन) ची ६ पदे,

(ग) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील सहायक प्रकल्प अधिकारी (रोजगार) ची ३३ पदे,

(घ) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील सहायक प्रकल्प अधिकारी (संनियंत्रण) ची १५ पदे,

(च) ग्राम सेवक प्रशिक्षण केंद्रामधील व्याख्याता संवर्गातील २ पदे,

(छ) जिल्हा परिषदेतील गट विकास अधिकारी (मनरेगा) ची ३३ पदे ".

४. मूळ नियमातील नियम ६ पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

"६. (१) सहायक गट विकास अधिकारी, गट ब (राजपत्रित) या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल, एकतर—

(क) पुढील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल ;

(१) ज्यांचे वय ३८ वर्षांपेक्षा जास्त नाही ;

(२) मागास प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे वय ४३ वर्षांपेक्षा जास्त नाही ;

(३) ज्यांनी सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण केली आहे.

**किंवा**

(ख) शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार घेण्यात आलेल्या मर्यादित विभागीय परीक्षेच्या निकालाच्या आधारे तयार केलेल्या सामायिक गुणवत्ता यादीच्या आधारे निवड करून करण्यात येईल.

ही परीक्षा जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३), (कृषि), जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (पशुसंवर्धन), जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (शिक्षण-शिक्षकेतर), जिल्हा सेवा (वर्ग-३) (लिपिक), जिल्हा सेवा (वर्ग-३) (सांख्यिकी), जिल्हा सेवा (वर्ग-३) (कार्यकारी व ग्राम विस्तार), जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (समाजकल्याण), जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (आरोग्य) मधील किमान ७ वर्षांची नियमित सेवा, ज्यावर्षी परीक्षा घेण्यात येणार आहे, त्या वर्षाच्या आधीच्या वर्षातील १ सप्टेंबर रोजी पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी सामायिक असेल :

परंतु, महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती), (सुधारणा) नियम, २०१८ प्रसिद्ध केल्यापासून ४ वर्षे अथवा या नियमाअंतर्गत सामायिक गुणवत्ता यादी तयार करेपर्यंत, यांपैकी जे अगोदर होईल तोपर्यंत, सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (राजपत्रित) या पदावर, या नियमामध्ये नमूद पदांवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांमधून सुयोग्य अधिकाऱ्याची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

(२) या नियमाच्या उप-नियम (१) मधील खंड (ख) मधील परंतुकानुसार पदोन्नतीने नेमणूक करताना जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क) किंवा जिल्हा सेवा (गट-क) मधील व्यक्तींपैकी वरिष्ठ श्रेणीतील व्यक्तींना प्राधान्य राहील म्हणजे प्रथम त्या त्या संवर्गातील श्रेणी १ मधील व्यक्तींचा प्रथम विचार होईल, तद्नंतर रिक्तता असल्यास श्रेणी २ व नंतर श्रेणी ३ मधील व्यक्तींचा विचार होईल; जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क) व जिल्हा सेवा (गट-क) मधील ज्या संवर्गातील श्रेणी रद्द करण्यात आलेल्या आहेत अशा संवर्गातील ज्येष्ठतेचा विचार होईल.

(३) महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती), (सुधारणा) नियम, २०१८ प्रसिद्ध केल्यापासून ४ वर्षे अथवा या नियमाच्या उप नियम (१) मधील खंड (ख) नुसार सामायिक गुणवत्ता यादी तयार करेपर्यंत, यांपैकी जे अगोदर होईल तोपर्यंत, या नियमाच्या उप नियम (१) मधील खंड (ख) च्या परंतुकानुसार पदोन्नतीने करावयाची नियुक्ती संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या विकल्पानुसार संबंधित विभागीय आयुक्तांनी तयार केलेल्या निवडसुच्यांनुसार करण्यात येईल.

(४) जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) व जिल्हा सेवा (गट क) मधील व्यक्तींनी गट ब **राजपत्रित** पदावरील पदोन्नतीसाठी संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत विभागीय आयुक्त यांना विकल्प कळविल्याशिवाय पदोन्नती दिली जाणार नाही. असा विकल्प एकदा दिल्यानंतर तो अंतिम असेल.

(५) महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती), (सुधारणा) नियम, २०१८ प्रसिद्ध केल्यापासून ४ वर्षे अथवा या नियमाच्या उप-नियम (१) मधील खंड (ख) नुसार सामायिक गुणवत्ता यादी तयार करेपर्यंत, यांपैकी जे अगोदर होईल तोपर्यंत, या नियमाच्या उप-नियम (१) मधील खंड (ख) च्या परंतुकानुसार सहायक गट विकास अधिकारी, गट-ब या पदावर पदोन्नतीने करावयाची नियुक्ती पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे आरक्षणाच्या टक्केवारीनुसार करण्यात येईल :—

**तक्ता**

| अ.क्र. (१) | संवर्ग (२) | | आरक्षणाची टक्केवारी (३) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क), (कृषि) | .. | १५ |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क), (पशुसंवर्धन) | .. | ५ |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क), (शिक्षण-शिक्षकेतर) | .. | ५ |
| ४ | जिल्हा सेवा (गट क), (लिपिक) | .. | १५ |
| ५ | जिल्हा सेवा (गट क), (सांख्यिकी) | .. | १० |
| ६ | जिल्हा सेवा (गट क), (कार्यकारी व ग्रामविस्तार) | .. | ४० |
| ७ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क), (समाजकल्याण) | .. | ५ |
| ८ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क), (आरोग्य) | .. | ५ |

(६) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (राजपत्रित) या पदावरील नामनिर्देशन व मर्यादित विभागीय परीक्षेच्या आधारे निवडीने नियुक्तीचे प्रमाण ५०: ५० टक्के इतके असेल. परंतु, महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती), (सुधारणा) नियम, २०१८ प्रसिद्ध केल्यापासून ४ वर्षे अथवा या नियमाच्या उप-नियम (१) मधील खंड (ख) नुसार सामायिक गुणवत्ता यादी तयार करेपर्यंत, यांपैकी जे अगोदर होईल तोपर्यंत, या नियमाच्या उप-नियम (१) मधील खंड (ख) च्या परंतुकानुसार पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल".

५. मुख्य नियमाच्या नियम ८ नंतर पुढील नियमांचा समावेश करण्यात येईल :–

"९. या नियमांतर्गत नियुक्त झालेल्या व्यक्तींने याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांनुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केली नसल्यास किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास, मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०. या नियमांतर्गत नियुक्त झालेल्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने, वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

११. या नियमांतर्गत नियुक्त झालेला व्यक्ती राज्यामध्ये कुठेही बदलीस पात्र राहील.

१२. नियम ६(१)(क) नुसार नियुक्त झालेल्या व्यक्तींना सामान्य प्रशासन विभागाच्या महाराष्ट्र नागरी सेवा [महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या राज्य नागरी सेवा परीक्षेद्वारे गट " अ " आणि गट " ब " (राजपत्रित) या पदाकरिता निवड होऊन, सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या व एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची सेवाज्येष्ठता निश्चित करणे] नियम, २०१५ मधील तरतूदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे सचिव.

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort
Mumbai 400 001, dated the 18th September 2018

***NOTIFICATION***

CONSTITUTION OF INDIA.

No. MDS. 1016/CR19/2016/Estt.3.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) Rules, 1973, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) (Amendment) Rules, 2018.

2. In rule 2 of the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) Rules, 1973 (hereinafter referred to as "the principal rules"), after clause *(a),* the following clauses shall be inserted, namely:—

"(a-1) "Assistant Block Development Officer, Group B (Gazetted)" means the Assistant Block Development Officer working in the office of the Panchayat Samiti, and includes the Assistant Block Development Officer (Administration) in the office of Divisional Commissioner, Assistant Project Officer (Employment) in the office of District Rural Development Agency, Assistant Project Officer (Monitoring) in the office of District Rural Development Agency, Lecturer in the office of Gramsevak Training Centre and Block Development Officer (MGNREGA) in the office of Zilla Parishad ;

*(a-2)* "Commission" means the Maharashtra Public Service Commission;".

3. In rule 3 of the Principal rules,—

(*a*) in sub-rule *(2)*, for clauses *(b)* and *(c)*, the following clauses shall be substituted, namely :—

" *(b)* Maharashtra Development Service, Group A (Gazetted) ;

*(c)* Maharashtra Development Service, Group B (Gazetted)";

(b) for sub-rules *(4)* and *(5)*, the following sub-rules shall be substituted, namely :—

" (4) The Maharashtra Development Service, Group A (Gazetted), shall consists of—

*(a)* 6 posts of Deputy Commissioner (Establishment) of the office of Divisional Commissioner,

*(b)* 6 posts of Deputy Commissioner (Development) of the office of Divisional Commissioner,

*(c)* 13 posts of Selection Grade Additional Chief Executive Officer of Zilla Parishads,

*(d)* 1 post of Director of Rashtriya Gram Swarajya Abhiyan,

*(e)* 1 post of Director of State Management Unit of Rural Housing,

*(f)* 21 posts of Additional Chief Executive Officer of Zilla Parishads,

*(g)* 34 posts of Project Director of District Rural Development Agency,

*(h)* 34 posts of Deputy Chief Executive Officer (General) of Zilla Parishads,

*(i)* 34 posts of Deputy Chief Executive Officer (Village Panchayat) of Zilla Parishads,

*(j)* 6 posts of Assistant Commissioner (Development) in the office of Divisional Commissioner,

*(k)* 6 posts of Assistant Commissioner (Enquiry) in the office of Divisional Commissioner,

*(l)* 6 posts of Assistant Commissioner (Inspection) in the office of Divisional Commissioner,

*(m)* 6 posts of Principal of Gramsevak Training Centre,

*(n)* 56 posts of Selection Grade Block Development Officer of Panchayat Samiti,

*(o)* 295 posts of Block Development Officer of Panchayat Samiti.

*(5)* The Maharashtra Development Service, Group B (Gazetted), shall consists of—

*(a)* 351 posts of Assistant Block Development Officer of Panchayat Samiti ,

*(b)* 6 posts of Assistant Block Development Officer (Administration) of the office of Divisional Commissioner,

*(c)* 33 posts of Assistant Project Officer (Employment) of District Rural Development Agency,

*(d)* 15 posts of Assistant Project Officer (Monitoring) of District Rural Development Agency,

*(e)* 2 post of Lecturer of Gramsevak Training Centre,

*(f)* 33 posts of Block Development Officer (MGNREGA) of Zilla Parishad.".

4. For rule 6 of the Principal rules, the following rule shall be substituted, namely :—

"6. *(1)* Appointment to the posts of Assistant Block Development Officer, Group B (Gazetted), shall be made either—

*(a)* by nomination of a suitable persons on the basis of result of competitive examination held by the Commission from amongst the candidates who,—

*(i)* are not more than 38 years of age ;

*(ii)* are not more than 43 years of age in the case of the persons belonging to reserve category ;

*(iii)* possess degree of a statutory university ; or

*(b)* by selection, on the basis of a common merit list prepared on the basis of the result of the Limited Departmental Examination conducted in accordance with the orders issued in that behalf, from time to time.

The said examination shall be common to the persons holding the posts of the District Technical Service (Class-III) (Agriculture), District Technical Service (Class-III) (Animal Husbandry), District Technical Service (Class-III) (Educational Non-teaching), District Service (Class-III) (Ministerial), District Service (Class-III) (Statistical), District Service (Class-III) (Executive and Village Extension), District Technical Service (Class-III) (Social Welfare) and District Technical Service (Class-III) (Health) of Zilla Parishads who have completed not less than seven years regular service on first September of the previous year in which the examination is held :

Provided that, for the period of 4 years from the date of publication of the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) (Amendment) Rules, 2018 or till the common merit list, under this clause, is prepared, whichever is earlier, the appointment to the post of Assistant Block Development Officer, Group 'B' (Gazetted) shall be made by promotion of suitable person from amongst the persons holding the posts as mentioned in this clause.

*(2)* In making appointment by promotion under the proviso to clause *(b)* of sub-rule *(1)*, preference shall be given on the basis of higher grade, so that persons in the Grade I shall be considered first in the respective District Technical Service or District Service and, if there are more vacancies then, persons in Grade II and then in Grade III shall be considered. In respect of District Technical Service (Group C) and District Service (Group C) where grades have been abolished, preference shall be given on the basis of seniority in that service.

*(3)* Appointment by promotion under the proviso to clause *(b)* of sub-rule *(1),* shall be made only for the period of 4 years from the date of publication of the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) (Amendment) Rules, 2018 or till the common merit list under clause *(b)* of sub-rule *(1)* is prepared, whichever is earlier, by the Government in accordance with the order of preference in the common merit list prepared and maintained separately for each revenue division by the concerned Divisional Commissioners.

*(4)* No person from the District Technical Service (Group C) or District Service (Group C) shall be appointed by promotion unless, he has duly exercised and communicated his option in writing to the Divisional Commissioner concerned through the Chief Executive Officer of the Zilla Parishad relinquishing his claim, if any, for being considered for appointment by promotion to a Group B post in another Service. The option once exercised shall be final.

*(5)* For the period of 4 years from the date of publication of the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) (Amendment) Rules, 2018 or till the common merit list under clause *(b)* of sub-rule *(1)* is prepared, whichever is earlier, appointment by promotion to the post of Assistant Block Development Officer, Group B (Gazetted), under the proviso to clause *(b)* of sub-rule *(1)* shall be made in accordance with percentage of reservation mentioned in the following table–

| Sr. No. | Service | Percentage of reservation |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | District Technical Service (Class-III) (Agriculture) | 15 |
| 2 | District Technical Service (Class-III) (Animal Husbandry) | 5 |
| 3 | District Technical Service (Class-III) (Education Non-teaching) | 5 |
| 4 | District Service (Class-III) (Ministerial) | 15 |
| 5 | District Service (Class-III) (Statistical) | 10 |
| 6 | District Service (Class-III) (Executive and Village Extension) | 40 |
| 7 | District Technical Service (Class-III) (Social Welfare) | 5 |
| 8 | District Technical Service (Class-III) (Health) | 5 |

*(6)* Appointment of the Assistant Block Development Officer, Group B (Gazetted) by nomination and selection on the basis of Limited Departmental Examination shall be 50 : 50. However, for the period of 4 years from the date of publication of the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) (Amendment) Rules, 2018 or till the common merit list under clause *(b)* of sub-rule *(1)* is prepared, whichever is earlier, shall be filled in by promotion under the proviso to clause *(b)* of sub-rule *(1)*.”.

5. After rule 8 of the Principal rules, the following rules shall be added, namely :—

“9. A person appointed under these rules shall be required to pass the examination in Hindi and Marathi language according to the rules made in that behalf by the Government unless he has already passed, or is exempted from passing such examinations.

10. A person appointed under these rules shall be required to obtain a certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology of the Government of Maharashtra, from time to time.

11. A person appointed under these rules shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

12. A person appointed to the post mentioned in clause *(a)* of sub-rule *(1)* of rule 6 shall be required to abide by the provisions of the Maharashtra Civil Services [fixation of seniority of the candidates recruited directly by selection for the posts of Group "A" and Group "B" (Gazetted) through State Civil Service Examination conducted by the Commission and undergoing Combined Probationary Training Programme] Rules, 2015, issued by General Administration Department, in this behalf.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASEEM GUPTA,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.